माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००१९४०**

**अपिलार्थी डॉ. हेमंत वसईकर**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक कुलसचिव**
कार्यकारी प्राधिकरणे विभाग, मुंबई विद्यापीठ,
फोर्ट, मुंबई-४०० ०३२

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रभारी कुलसचिव**
कार्यकारी प्राधिकरणे विभाग, मुंबई विद्यापीठ,
फोर्ट, मुंबई-४०० ०३२

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १३.१०.२०२५**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २०.०२.२०२३ | १६.०३.२०२३ | २०.०३.२०२३ | १९.०८.२०२३ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १६.०६.२०२३ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. १६.०३.२०२३ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. २०.०२.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *(a) Copies of CDC meetings report submitted by colleges to the University as per MPU Act, 2016 Viz Sardar Patel Institute of Technology, Sardar Patel College of Engineering, and Veermata Jijabai Technological Institute. (b) If any college has not submitted CDC meetings reports, Please provide the documents or letters issued to colleges by the University as per MPU Act, 2016. (c) Please provide documents of Local Inquiry Committee (LIC) reports submitted by LIC committee during its visit to Sardar Patel Institute of Technology, Sardar Patel College of Engineering, and Veermata Jijabai Technological Institute. (d) Minutes of meeting of Management Council of University for the said period. (e) Provide the copies of documents, rules, notices, circulars etc., of Casual Leave, Vacation of Engineering teaching faculties and working hours applicable to the affiliated institutions namely Sardar Patel Institute of Technology, Sardar Patel College of Engineering, and Veermata Jijabai Technological Institute."*

..२/-

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कुलसचिव, कार्यकारी प्राधिकरणे यांनी दि. १६.०३.२०२३ रोजी अपिलार्थींना (d) मुद्याची माहिती उपलब्ध करुन दिली. अपिलार्थीनी पूर्ण माहिती मिळालेली नाही असे नमुद करुन दि. २०.०३.२०२३ रोजी प्रथम अपील दाखल केले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, अपिलार्थींचा माहिती अर्ज ३ जन माहिती अधिकारी यांच्याशी संबंधीत आहे. मुद्दा क्र. (a), (b) व (e) जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, महाविद्यालयीन शिक्षक मान्यता कक्ष, मुंबई यांच्याशी संबंधीत आहे. मुदा क्र. (c) जन माहिती अधिकारी तथा जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग, फोर्ट, मुंबई यांच्याशी संबंधीत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असेही सादर केले की, त्यांनी त्यांच्याशी संबंधीत मुद्या क्र. (d) ची माहिती अपिलार्थींना दिलेली आहे व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १९.०८.२०२३ रोजी आदेशित केले की, "*The PIO-Deputy Registrar, College Affiliations & Delopment Unit (CAD) is directed to provide as below within 10 days from the receipt of this order: - (1) With respect to point no. a - PIO, CAD section to clearly mentioned and write to the appellant whether report is available or not. (2) With respect to point no. b - PIO, CAD section to provide the available relevant circulars. (3) With respect to point no. c - PIO, CAD section to provide the available information. (4) With respect to point no. d - PIO, EAU section to provide updated information though earlier provided. (5) With respect to point no. e - PIO, CTA section to provide available information.*"

अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, त्यांना मुद्दा क्र. (d) ची माहिती प्राप्त झालेली आहे. मुद्दा क्र. (a) व (b) ची अप्राप्त आहे व मुद्दा क्र. (c) संबंधीत महाविद्यालयाने विद्यापीठास दिलेले अहवालाची प्रत प्राप्त आहे. परंतु, स्थानिक चौकशी समितीचा अहवाल मिळालेला नाही. तसेच, मुद्दा क्र. (e) ची माहिती अपूर्ण मिळालेली आहे.

सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. पुढील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग, फोर्ट, मुंबई व जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, महाविद्यालयीन शिक्षक मान्यता कक्ष, फोर्ट, मुंबई यांची उपस्थिती आवश्यक आहेत.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०४.११.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

**मुंबई**
**दिनांक : १४.१०.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

प्रत: (१) जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग, फोर्ट, मुंबई.
(२) जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, महाविद्यालयीन शिक्षक मान्यता कक्ष, फोर्ट, मुंबई.

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००१९४०**
**अपिलार्थी डॉ. हेमंत वसईकर**
**सुनावणी दिनांक : ०४.११.२०२५ (In continuation of order dt १४.१०.२०२५)**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी आयोगाने सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. पुढील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग, फोर्ट, मुंबई व जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, महाविद्यालयीन शिक्षक मान्यता कक्ष, फोर्ट, मुंबई यांची उपस्थिती आवश्यक आहेत असे आदेशित केले होते.

२. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, महाविद्यालयीन संलग्नता व विकास विभाग, मुंबई यांनी आयोगास सादर केले की, दि.२५.०७.२०२३ च्या पत्रान्वये मुद्दा क्र. (a) व (b) ची माहिती पुरविण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, त्यांना पुरविण्यात आलेली माहिती त्यांच्या मागणी प्रमाणे नाही.

३. जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, महाविद्यालयीन शिक्षक मान्यता कक्ष, मुंबई यांनी आयोगास सादर केले की, माहिती अर्जातील मुद्दा क्र. (e) च्या अनुषंगाने अपिलार्थीना रजा विषयी माहिती देण्यात आलेली आहे व अन्य मुद्यांची माहिती दर शैक्षणिक वर्षास शैक्षणिक दिनदर्शिका (Academic Calendar) मध्ये उपलब्ध असते व शैक्षणिक दिनदर्शिका (Academic Calendar) ची प्रत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, संकेतस्थळावर माहिती शोधण्याची प्रयत्न केला. परंतु, माहिती उपलब्ध झालेली नाही.

४. जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, महाविद्यालयीन संलग्नता व विकास विभाग, मुंबई यांनी माहिती अर्जातील मुद्दा क्र. (a) व (b) ची माहिती अपिलार्थीना आदेशप्राप्तीच्या १० दिवसांत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अन्वये नोंदणीकृत टपालाने निशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

५. जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, महाविद्यालयीन शिक्षक मान्यता कक्ष, मुंबई यांनी माहिती अर्जातील मुद्दा क्र. (e) च्या अनुषंगाने संकेतस्थळावर माहिती उपलब्धतेविषयी तपासावे व माहिती उपलब्ध नसल्यास अभिलेखावरुन त्याची प्रत अपिलार्थीना आदेशप्राप्तीच्या १० दिवसांत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अन्वये नोंदणीकृत टपालाने निशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

प्रदीप व्यास
6-11-2025

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : ०६.११.२०२५**

State Information Commission, Greater Mumbai

प्रत: (१) जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग, फोर्ट, मुंबई.
(२) जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, महाविद्यालयीन शिक्षक मान्यता कक्ष, फोर्ट, मुंबई.